नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 06/08/2020 (गुरूवार)
(सकाळ)

---

## आत्महत्येस प्रवृत्त करणाऱ्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. रामटेक :– अंतर्गत 01 कि.मी. अंतरावर आंबेडकर नगर मंगळवारी वार्ड रामटेक येथे दिनांक 04/08/2020 चे 23.40 वा. ते दिनांक 05/08/2020 चे 06.00 वा. सुमारास आरोपी नामे – 1) अशोक किसन नागपुरे(भासरे), वय 55 वर्ष, 2) रजनी अशोक नागपुरे(जाऊ), वय 40 वर्ष, 3) शेवंती धनराज मोहनकर(जाऊची आई), वय 65 वर्ष, सर्व रा. आंबेडकर नगर, मंगळवारी वार्ड रामटेक यांनी संगनमत करून मृतक नामे– सौ सुभद्रा जगदीश नागपुरे, वय 52 वर्ष, रा. आंबेडकर नगर, मंगळवारी वार्ड रामटेक हिच्या सोबत घरगुती कारणावरून वारंवार झागडा–भांडण करून तिला मानसीक त्रास देत होते. तसेच आरोपी क्र 4) सागर घनश्याम झाडे, वय 28 वर्ष, रा. दुधाळा व 5) प्रवीन सदाशीव केळवदे, वय 24 वर्ष, रा. पारशिवनी यांनी मृतकाच्या मुलीचे चंद्रपुर येथील सचीन मांढरे याचे मोबाईल वर मॅसेज करून मृतकाचे मुलीचे जुळलेले लग्न तोडल्याने सौ सुभद्रा नागपुरे हिने आपले राहते घरी गळाफास लावुन आत्महत्या केली. अश्या सुचनेवरून पो. स्टे. रामटेक येथे मर्ग क्र 44/2020 कलम 174 जाफौ प्रमाणे दाखल करून चौकशीत अंती आरोपी क्र 1 ते 5 यांनी तिला आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याचे निष्पन्न झाले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– विलास जगदीश नागपुरे, वय 33 वर्ष, रा. आंबेडकर नगर, मंगळवारी वार्ड रामटेक याचे रिपोर्ट वरुन व मर्गच्या तपासात आरोपी कारणीभूत असल्याचे निष्पन्न झाल्यावरून पो.स्टे. रामटेक येथे आरोपी विरुध्द कलम 306, 34 भादंवी. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला असून आरोपीतांना अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास परिवीक्षाधीन मपोउपनि बेद्रे 8788758742 या करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर